## प्रेसनोट दिनांक १६/०३/२०२३

## दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवडची कामगिरी

# रात्रगस्त पेट्रोलिंग दरम्यान गुटख्याची वाहतुक करणाऱ्या ०३ आरोपींना अटक करून, त्यांचेकडुन किं.रू. १७,१२,०२८/- रूचा मुद्देमाल हस्तगत.

मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत अवैध धंदयावर कारवाई करणेबाबत आदेश दिले होते. दिनांक १५/०३/२०२३ रोजी दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामदास इंगवले, अधिकारी व पोलीस अंमलदार असे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत रात्रगस्त करीत असताना पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ यांनी दिलेल्या आदेशान्वये चिखली पोलीस ठाणे कडील पोलीस निरीक्षक राजेंद्र बर्गे व त्यांचेकडील स्टाफसह चिखली पोलीस ठाणे हद्दीत भंगारची दुकाने चेक करीत असताना एक ॲक्सेस मोपेड व टेम्पो अशी वाहने सरकारी वाहने पाहुन पळुन जावु लागली. त्यांना वरील स्टाफचे मदतीने काही अंतरावर जावुन आरोपी नामे १) **शाकिर शब्बीर अन्सारी**, वय-२३ वर्षे, रा- लोहीया नगर, एफ पी ५४, गंजपेठ, पुणे २) **चाँद गुलाम शेख**, वय-४२ वर्षे, रा-१०५३, भवानी पेठ, एडी कॅम्प चौक, पुणे तसेच ॲक्सेस मोपेडवरील ३) **नफिज शरिफ अहमद अन्सारी**, वय-३४ वर्षे, रा- शिवनेरी नगर, मरियन कॅम्पलेक्स, फ्लॅट नंबर-२०३, आयडीयल बेकरी जवळ कोंढवा, पुणे यांना शिताफिने पकडले. सदर वाहनांची तपासणी केली असता, टेम्पो क्रमांक एम एच १२ एस एक्स ०८५३ या मध्ये किं.रू. ९,६८,५२८/- रू चा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा, पान मसाला, तंबाखुजन्य पदार्थ या असुरक्षित आरोग्यास घातक/ अपायकारक असा गुटख्याची एकुण २८ पोती मिळुन आली. तसेच ॲक्सेस मोपेड गाडी क्रमांक एम एच १४ जी टी ०५०४ या मध्ये ४,४३,५००/- रोख रक्कम मिळुन आली, तसेच सदर गुन्हा करते वेळी वापरलेली २,५०,०००/- रू चा अशोक लेलँड कंपनीचा टेम्पो व कि.रू. ५०,०००/- मारूती सुझुकी कंपनीची ॲक्सेस मोपेड असा एकुण मिळुन १७,१२,०२८/- रूपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने त्यांचे विरूध्द **चिखली पोलीस ठाणे गुरनं १६८/२०२३** भा.दं.वि.कलम ३२८,२७२,२७३,१८८ सह अन्न व सुरक्षा मानके कायदा कलम ३०(२)(ए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवडचे मा. पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चोबे, मा. पोलीस सह आयुक्त श्री मनोज लोहीया, मा. अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), स्वप्ना गोरे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री रामदास इंगवले, सहा पोलीस निरीक्षक अंबरीष देशमुख, चिखली पोलीस ठाणे कडील पोलीस निरीक्षक राजेंद्र बर्गे, सपोनि नकुल न्यामणे, तसेच पोलीस अंमलदार राहुल खारगे, प्रविण माने, उमेश पुलगम, विक्रांत गायकवाड, नितीन लोखंडे, प्रशांत सैद, औदुंबर रोंगे तसेच चिखली पोलीस ठाणे कडील किसन वडेकर, शिंदे व घनवट यांचे पथकाने केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
**पोलीस उप आयुक्त (गुन्हे)**
**पिंपरी चिंचवड**